निगमित संप्रेषण व निवेशक संबंध

प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5

टेलि - 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 487

वृत्तपत्रीय निवेदन

## सातारा विभागातील अधिनस्थ कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे " सातारा के सितारे " कार्यक्रमाचे आयोजन

**पुणे दिनांक ६ डिसेंबर २०२१** : देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रणी बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने आपल्या सातारा विभागातील अधिनस्थ कर्मचाऱ्यांच्या सन्मानार्थ " सातारा के सितारे " हा कार्यक्रम पुणे शहराच्या विभागीय कार्यालयात दिनांक ४ डिसेंबर २०२१ रोजी आयोजित केला होता. बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी आपल्या दैनंदिन कामाच्या व्यतिरिक्त बँकेच्या व्यवसायात वृद्धी होण्यासाठी विशेष परिश्रम घेऊन अधिकाधिक व्यवसाय मिळविण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार केला. बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा यांच्यासह संसाधन नियोजन विभागाचे सरव्यवस्थापक श्री व्ही एन कांबळे, मनुष्यबळ व्यवस्थापन विभागाचे सरव्यवस्थापक श्री आर एस बन्सल, निरीक्षण विभागाचे सरव्यवस्थापक श्री व्ही डी कोल्हटकर, पुणे विभागाचे विभागीय व्यवस्थापक व सरव्यवस्थापक श्री राजेश सिंह, सातारा विभागाच्या विभागीय व्यवस्थापक श्रीमती अपर्णा जोगळेकर, व राजभाषा विभागाचे सहाय्यक सरव्यवस्थापक डॉ राजेंद्र श्रीवास्तव हे कार्यक्रमास उपस्थित होते.

बँकेच्या कर्मचारी वर्गाला संबोधित करताना बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी बँकेच्या कर्मचारी वर्गासाठी हा अभिमानाचा क्षण असल्याचे व प्रत्येक बँक कर्मचाऱ्याने कसोशीने प्रयत्न केल्यामुळेच बँकेला सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँकांमध्ये व्यवसाय वृद्धीसाठी प्रथम स्थान प्राप्त करणे शक्य झाले असल्याचे सांगितले. बँक अतिशय वेगाने प्रगती करीत असून तिरुमला येथे अलीकडेच आपली २००० वी शाखा उघडून बँकेने आपला देशव्यापी विस्तार करण्याच्या दृष्टीने पाउले उचलल्याचे त्यांनी सांगितले. सन २०२४ पर्यंत बँक रु ५ लाख कोटीचा व्यवसाय टप्पा गाठण्यास कटिबद्ध असल्याचे मत व्यक्त करून सर्व कर्मचाऱ्यांच्या कासोशीच्या व सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळेच ते शक्य असल्याचा विश्वास व्यक्त केला.

बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा यांनी सातारा विभागातील बँकेच्या अधिनस्थ कर्मचाऱ्यांनी आपल्या सततच्या प्रयत्नाने साध्य केलेले यश हे अन्य विभागांना स्फूर्तीदायक ठरेल असे सांगितले. बँकेच्या अधिनस्थ कर्मचाऱ्यांचे बँकेच्या व्यवसाय व अन्य वाढीत महत्वाचे योगदान असल्याचे सांगून व्यवसाय वाढ, गृह व्यवस्था , साक्षेपी वृत्ती इत्यादी निकषांवर अधिनस्थ कर्मचारी हे बँकेचा कणा असल्याचे ठाम प्रतिपादन कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा यांनी केले. कार्यकारी

संचालक श्री हेमंत टम्टा यांनी बँकेने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी सुरु केलेल्या संवर्ग निरपेक्ष प्रोत्साहनात्मक बाबींचा व बँकिंग उद्योगात अशा बाबींनी घालून दिलेल्या नव्या आदर्शांचा आवर्जून उल्लेख केला. .

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन होऊन कार्यक्रमाची सुरवात झाली. अधिनस्थ कर्मचाऱ्यांचे अनुभव कथन करणारा दृकश्राव्य कार्यक्रम सादर करण्यात आला. तसेच बँकेचा व्यवसाय वाढविण्यासाठी कशा प्रकारे प्रयत्न केले, याचेही अनुभव अधिनस्थ कर्मचाऱ्यांनी कथन केले. राजभाषा विभागाचे सहाय्यक सरव्यवस्थापक डॉ राजेंद्र श्रीवास्तव यांनी कार्यक्रमाचे सादरीकरण केले व सातारा विभागाच्या विभागीय व्यवस्थापक श्रीमती अपर्णा जोगळेकर यांनी आभार प्रदर्शन केले.